अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार 4 ऑक्टोबर रोजी मुल येथे उमेदवारी अर्ज दाखल करणार

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस खा. भूपेंद्र यादव, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची विशेष उपस्थिती राहणार

राज्याचे अर्थमंत्री, चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री, बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील भाजपा-शिवसेना-रिपाई (आ)-रासप महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार दिनांक 4 ऑक्टोबर 2019 रोजी दुपारी 12.00 वा. आपला उमेदवारी अर्ज उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुल येथे दाखल करणार आहे.

अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार एका भव्य रॅलीसह भाजपा, शिवसेना, रिपाई (आ), मित्रपक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह उपविभागीय अधिकारी कार्यालय मुल येथे उमेदवारी अर्ज दाखल करतील. यावेळी विशेषत्वाने भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस खा. भूपेंद्रजी यादव व महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्यासह माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर, माजी मंत्री शोभाताई फडणवीस, महाराष्ट्र वनिवकास महामंडळाचे अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख संदीप गि-हे, सिक्की यादव, नितीन येरोजवार, आशिष कावटवार, रिपाई (आ) चे प्रदेश उपाध्यक्ष बालकुणाल आमटे, जिल्हाध्यक्ष सिध्दार्थ पथाडे, कार्यकारी अध्यक्ष प्रा. वासुदेव कांबळे, महासचिव जयप्रकाश कांबळे, सचिव राजीव भगत, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा किरण गेडाम, बल्लारपूर तालुकाध्यक्ष धर्मेश नागदेवते, सचिव प्रविण डोर्लीकर, प्रा. संतोष रामटेके, दयाराम मुन, माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी, भाजपाचे जिल्हाध्यक्षा तथा बल्लारपूरचे नगराध्यक्ष हरीश शर्मा, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. संध्या गुरनुले, भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. रेणुका दुधे, जिल्हा परिषद सभापती ब्रिजभूषण पाझारे, मुल नगर परिषदेच्या अध्यक्षा रत्नमाला भोयर, मुल पंचायत समितीच्या सभापती पूजा डोहणे, पोंभुर्णा पंचायत समितीच्या सभापती अलका आत्राम, चंद्रपूरच्या महापौर सौ. अंजली घोटेकर, पोंभुर्णा नगर पंचायतीच्या अध्यक्षा श्वेता बनकर, उपाध्यक्ष रजिया कुरैशी, मुल नगर परिषदेचे उपाध्यक्ष नंदू रणदिवे, चंद्रपूर पंचायत समितीचे उपसभापती चंद्रकांत धोडरे, जिल्हा परिषद सदस्य हरीश गेडाम, सौ. वैशाली बुध्दलवार, राहूल संतोषवार, पृथ्वीराज अवताडे, सौ. शितल बांबोळे, गौतम निमगडे, सौ. वनिता आसुटकर, सौ. रोशनी खान, बल्लारपूर नगर परिषदेच्या उपाध्यक्षा सौ. मिना चौधरी, बल्लारपूर पंचायत समितीचे सभापती गोविंद पोडे, उपसभापती सौ. इंदिरा पिपरे, पंचायत समिती सदस्य सोमेश्वर पदमगिरीवार, पंचायत समिती सदस्य सौ. विद्या गेडाम, सौ. जयश्री वलकेवार, सौ. वर्षा लोनबले, घनश्याम जुमनाके, संजय यादव, सौ. सिंधु लोनबले, सौ. केमा रायपुरे, पोंभुर्णा पंचायत समितीचे उपसभापती विनोद देशमुख, पंचायत समिती सदस्य गंगाधर मडावी, सौ. ज्योती बुरांडे, मुल पंचायत समितीचे उपसभापती चंदू मारगोनवार, किशोर पंदिलवार, गजानन गोरंटीवार, राजू बुध्दलवार, रमेश पिपरे, प्रभाकर भोयर, काशी सिंह, मनिष पांडे, निलेश खरबडे, समीर केने, राजू गुंडेटी, हनुमान काकडे आदी भाजपा, शिवसेना, रिपाई (आ), मित्रपक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे.

विकासपुरूष, लोकनेते सुधीर मुनगंटीवार यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपा-शिवसेना-रिपाई (आ)-रासप महायुतीतर्फे करण्यात आले आहे.